प्रशिक्षण साहित्य

# अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८

ECONET

इकोनेट

पुणे ४११ ०१३

Email :- econet.pune@gmail.com

# भारताचे संविधान

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व
त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधान सभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगिकृत आणि अधिनियमित करून

स्वत:प्रत अर्पण करत आहोत

प्रशिक्षण साहित्य

# अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८

इकोनेट

पुणे ४११ ०१३

Email: - econet.pune@gmail.com

प्रकाशक
इकोनेट
फ्लॅट नं २, गुलमोहर ओरियन
स. नं ११०/अ/९, रामटेकडी रोड,
हडपसर, पुणे ४११ ०१३
फोन नं.ः □०२०□२६८११३३४
E-mail :- econet.pune@gmail.com

© इकोनेट

*Material from this publication may be Used without prior permission if the source Is properly acknowledged, this is a booklet explaining where we have made an attempt to explain the scheduled tribes and other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006 in simple Marathi and not an analysis of low.*

प्रथमावृत्ती
जून २००८

द्वितीय आवृत्ती
मार्च २०१५

मुद्रक
अनिता प्रिंटर्स
वडगांव शेरी
पुणे

खाजगी वितरण व शैक्षणिक प्रयोजनाकरिता प्रस्थापित

# प्रस्तावना

भारतात आदिवासी लोकांना आदिवासी किंवा वनवासी असे म्हटले जाते.याचाच अर्थ असा की, आदिवासी लोक हे पूर्वीपासून जंगलात राहणारे मुळ रहिवासी आहेत. आदिवासी समाज आपल्या रोजच्या अन्न, वस्त्र, निवारा, चारा, जळाऊ लाकूड, संस्कृती व पारंपारिक रूढी परंपरांसारख्या आवश्यक गोष्टींसाठी जंगलावरच आवलंबून असतो. म्हणजेच त्यांची बरीचशी उपजिविका ही जंगलावरच आधारित आहे. आदिवासींचे पूर्वीपासून चालत आलेले जंगलावरील काही पारंपारिक हक्क आणि कर्तव्ये आहेत की ज्यांची दखल शासनाने कधीही घेतली नव्हती, तसेच आदिवासींनी हे जंगल पूर्वीपासून राखले आहे व त्याचे संरक्षण केले आहे. हेही कायद्याच्या दृष्टीने मानले जात नव्हते. जर आपण आपला पूर्वीचा इतिहास पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, आदिवासी समुदायांवर पूर्वीपासून अन्याय होत आला आहे. कारण आदिवासींकडे असणारी जंगलसंपत्ती जमीनदार, ठेकेदार, व्यापारी, इंग्रज लोक व आपले सरकार यांच्या नियंत्रणात होती.

इंग्रजांचे भारतावर राज्य असताना त्यांना रेल्वे, जहाजबांधणी व इमारतींसाठी मोठया प्रमाणात जंगलातील लाकडांची गरज होती; परंतु ब-याच आदिवासी समाजांनी इंग्रजांना जंगलतोड विरोध केल्यामुळे इंग्रजांनी जंगलासंबधी काही जाचक कायदे केले की, ज्यामुळे आदिवासींना त्यांच्याच जंगलात व जमिनीवर नियमांच्या बंधनात वागावे लागले. इंग्रजांनी त्यावेळेस केलेले बरेचसे कायदे आजही लागू आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावरही सरकारने आदिवासींच्या हक्कांवर वेगवेगळया जंगल व जंगली प्राणी संरक्षण कायद्यांमुळे अनेक बंधने घातली. तसेच विकास कामांच्या नावावर ब-याच आदिवासींना त्यांच्या जंगल अधिकारांचा पुरेसा मोबदला मिळाल्याशिवाय त्यांच्या राहत्या ठिकाणावरून इतर ठिकाणी विस्थापित केले.

जंगलात असणा-या वेगवेगळया बंधनांमुळे ब-याच आदिवासींना जंगल हे आपले नसून सरकारचे किंवा वनखात्याचे आहे असे वाटायला लागले आहे. आणि आपणही जंगल संवर्धनातील व व्यवस्थापनातील अतिशय महत्त्वाचा भाग आहोत याचाही त्यांना विसर पडत चालला होता. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन आदिवासींच्या व जंगलावर आधारित इतर समाजाच्या जंगलावर असणा-या पारंपारिक हक्कांना मान्यता

देण्यासाठी “आदिवासी व जंगलावर आधारित इतर समुदायांच्या जंगलावरील हक्कांस मान्यता देणारा कायदा”

भारत सरकारने डिसेंबर २००६ मध्ये पास केला. या कायद्याची अंमलबजावणी ही एक वर्षानंतर म्हणजेच ३१ डिसेंबर २००७ ला त्या कायद्याचे नियम आल्यानंतर सुरू झाली. असे असूनही हा कायदा डिसेंबर २००६ पासून लागू आहे. या कायद्यात म्हटलेल्या हक्कांमध्ये जंगलाचा योग्य वापर, जंगलाचे संवर्धन व संरक्षण, निसर्गातील जी विविधता आहे त्याचे जतन व संरक्षण, निसर्गातील जी विविधता आहे त्याचे जतन व संरक्षण आणि पर्यावरणाचे संतुलन यांसारख्या जबाबदा-यांचाही सामावेश केला आहे.

# अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८



➢ हा कायदा कुठे व कोणासाठी लागू होऊ शकतो?

हा कायदा जेथे जंगल आहेत व जेथे आदिवासी व जंगलावर आधारित इतर समुदाय राहतात तेथे लागू होईल.

➢ पण कायदा समजणं खूप अवघड असतं असं म्हणतात तर मग

म्हणजे हा कायदा सर्व प्रकारच्या जंगलासाठी लागू होतो का ?

होय, हा कायदा राखीव जंगले, संरक्षित जंगले, अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानांसारख्या सर्व प्रकारच्या जंगलामध्ये लागू होतो.

पण कायदा समजणं खूप अवघड असतं असं म्हणतात तर मग
आम्हाला हा कायदा कसा काय कळणार ?

कोणताही कायदा आपण जर पाहिला तर त्याची भाषा समजायला थोडी अवघड असते. प्रत्येक कायद्याबद्दल अधिक स्पष्टता येण्याशाठी त्या कायद्याच्या सुरवातीला काही महत्त्वाच्या शब्दांचे अर्थ दिलेले असतात. ते अर्थ आपण समजून घेतले की तो कायदा समजायला थोडे सोपे जाते. या कायद्यामध्येही अशाच काही महत्त्वाच्या शब्दांचे अर्थ दिलेले आहेत ते आपण समजण्याचा प्रयत्न करू.

- आदिवासी जमाती(ST)

आदिवासी जमाती म्हणजे पुर्वीपासून जंगलांमध्ये राहणारे व जंगलावर आपल्या उदरनिर्वाहासाठी अवलंबून असणारे आदिवासी जमातीतील लोक किंवा गट. या कायदयामध्ये पाचव्या अनुसूचित दिलेल्या आदिवासी जमातींच्या यादीमध्ये असलेल्याच ज़मातींना आदिवासी असे म्हटले गेले आहे.

- जंगलावर आधारित इतर समुदाय :

जंगलावर आधारित इतर समुदाय म्हणजे आदिवासी समाजा व्यतिरिक्त असा समुदाय व ज्यातील लोक १३ डिसेंबर २००५ पूर्वी ७५ वर्षापासून किंवा तीन पिढयांपासून जंगलामध्ये राहत असून आपल्या दैनंदिन उपजीविकेशाठी जंगलावर अवलंबून आहेत.

- जंगल जमीन :

जंगल जमीन म्हणजे जंगल क्षेत्रामध्ये येणारी कोणत्याही प्रकारची ज़मीन. यामध्ये वर्गीकरण नसलेली जंगले, सीमा नसलेली जंगले, संरक्षित जंगले, राखीव जंगले, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, अस्तित्वात असलेली किंवा मानलेली जंगले यांचा सामावेश होतो. तसेच जंगल जमिनींमध्ये येणा-या सर्व गोष्टींचा समावेश त्यामध्ये होतो. उदा. नदी, ओढे, विहिरी,तळी, देवराई, गायरान वगैरे.

सामुदायिक जंगल संसाधन :

सामुदायिक जंगल संसाधन म्हणजे गावाच्या परंपरागत हद्दीमध्ये असणारे आणि समाजाने पिढयानपिढया संरक्षण व संवर्धन केलेले सामुदायिक जंगल. या सामुदायिक जंगलामध्ये तेथिल समाजाचे पारंपारिक अधिकार असलेली जंगले, राखीव व सुरक्षित जंगले, अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने सारख्या कोणत्याही जंगलात असू शकतात.

- संकटग्रस्त वन्य जीवांचे वसतिस्थान/क्रिटीकल वाइल्ड लाईफ हॅबीटाट (सुरक्षितता व संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले वन्य प्राण्यांचे राहण्याचे क्षेत्र (CWH)

क्रिटीकल वाइल्ड लाईफ हॅबीटाट म्हणजे सरकारने अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांमध्ये जंगलातील प्राण्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी घोषित केलेले विशिष्ट ठिकान, अशा क्षेत्रामध्ये लोकांच्या फिरण्यावर व त्यांच्या जंगलावरील हक्कांवर काही निर्बंध आणणे किंवा माणसांचा वावर टाळण्यासाठीचे नियम अशा ठिकाणात येणा-या गावांचे या नियमांतर्गत इतर ठिकाणी पुनर्वसनही केले जाऊ शकते.

- गौण वनोपज ः

गौण वनोपज म्हणजे इमारती लाकूड सोडून जंगलातील इतर सर्वकाही उत्पादन की ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

- बांबू
- मोडलेल्या फांद्या (ब्रश वूड) व खोडे
- वेत
- रेशीम कोष व रेशीम
- मध व मेण
- लाख
- डिंक
- तेंदू/केंदू पत्ता
- औषधी वनस्पती
- मुळे व कंदमूळ

वरील गौण वनोपज म्हणजे आदिवासी स्वशासन कायद्यात म्हटलेली फक्त 33 वन उत्पादने आहेत का ?

नाही. या कायद्यात 33 पेक्षा जास्त वन उत्पादनांचा सामावेश केला आहे. त्यामध्ये इमारती लाकूड सोडून जंगलातील इतर सर्व वनोपज की ज्यात फळे, फुले, पाने, साल, मुळे, कंदमुळे, वाळलेले जळाऊ लाकूड, मध, औषधी वनस्पती व त्यासारख्या कोणत्याही वनोपजाचा सामावेश होतो.



- **अनुसूचित क्षेत्र ः**

अनुसूचित क्षेत्र म्हणजे राज्यपालांच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेले आदिवासी क्षेत्र की जेथे बहुसंख्य समुदाय हा आदिवासी जमातीतील असतो.

- **नोडल एजन्सी ः**

या कायद्याच्या योग्यरीत्या अंमलबजावणीकरिता भारत सरकारचे आदिवासी व्यवहार मंत्रालय नोडल एजन्सी म्हणून काम पाहील.

- **जंगलावरील पारंपारिक हक्क मान्य करण्यासाठी लागू करण्यात आलेल्या कायद्यात कोणकोणते हक्क मान्य केले आहेत ?**
- **हा कायदा कोणाला लागू होतो ?**

१. हया कायद्यात पाचव्या अनुसूचीमध्ये असलेल्या आदिवासी जमाती (ST) व जंगलावर आधारित ७५ वर्षापासून राहणा-या (डिसेंबर २००५ पुर्वी) समाज यांचाच सामावेश होतो.

२. या कायद्यांतर्गत व्यक्तीगत व सामुहीक अधिकार देण्यात आले आहेत.

**वैयक्तीक अधिकार** ः जंगलामध्ये असलेल्या घराखालची जमिन व वनजमिनीवर असलेल्या अशा शेतजमिनी ज्या आपण १३ डिसेंबर २००५ वर्षी कसत होतो त्या दोन्ही प्रकारच्या जमिनीचा मालकी हक्क मिळणे.या दोन्ही जमिनींचे हस्तांतरन करून त्यांचे मालकी हक्क देण्यात येतात. त्यांच्या उदरनिर्वाह व उपजिविकेसाठी हा नियम करण्यात आला आहे. या जमिनी इतरांच्या नावी करता येत नाही व त्याची विक्रीही करता येत नाही.

३. राज्य /केंद्र किंवा कोणत्याही शासनाने दिलेल्या वनजमिनीचा पट्टा/ भाडेपट्टीत असलेल्या अशा जमिनी ज्या वनजमिनीवर आहे अशा जमिनींच्या अधिकारांचे हस्तांतरनाचा अधिकार.

**सामुहिक अधिकार**

४. निस्तार हक्कांसारखे जुन्या राजे-महाराजे, जमिनदारी यांसारख्या कारभारात, वापरात असणारे समुदायाचे पारंपारिक अधिकार ज्यांचे निस्तार पत्रकासारख्या दस्तवेजात उल्लेख असलेले अधिकार हे या कायद्यात मान्य केले गेले आहेत.

५. गावातील किंवा गावाच्या आवतीभोवती असलेली जंगले ज्यातुन इमारती लाकडाखेरिज वनोपज गोळा केले जातात अशा जंगलांचा गाव बैठकीमध्ये नकाशा बनविणे व त्यावरिल ठिकाणांची स्थानिक नावे लिहीणे. अशा नकाशात दाखविलेल्या सर्व वनक्षेत्रामधील गौण वनोपज गोळा करणे, वापरणे व विक्री करण्याचा (विल्हेवाट लावण्याचा) अधिकार.

६. मासे पकडणे व त्यासारखे इतर कोणतेही उत्पादन व पाण्याच वापर यावरील अधिकार.

७. स्थानिक व भटक्या समाजाचे गुरे चरण्याचा (स्थिर किंवा फिरस्त ) व पारंपारिक हंगामी जंगल वापरण्याचा अधिकार.

८. आदिम जमातीचे जीवन व त्यांचे जीवनमान संवेदनशील असल्यामुळे असे ठिकाण जेथे आदिम जमाती राहतात त्या विस्ताराच्या संरक्षणाचा अधिकार (महाराष्ट्रामध्ये कोलाम, माडिया व कातकरी या तीन आदिम जमाती आहेत).

९. वनजमिनीवर असलेल्या कोणत्याही वादग्रस्त जमिनी ज्यांचे वास्तविक मालकी हक्क कोणाचेही असले तरी त्यावरील चालु वापरावर अधिकार.

१०. नोंद झालेल्या किंवा न झालेल्या गावांचा वनगावांचा, जुन्या वस्त्यांचा किंवा त्यासारख्या कोणत्याही प्रकारच्या गावांचे रूपांतर महसूल गावात करण्याचा अधिकार

११. समुदाय परंपरेने जतन करत असलेल्या सामुदायिक जंगल संसाधनाचे संरक्षण, संवर्धन, वाढ व त्याचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार.

१२. निसर्गातील जी विविधता आहे त्याचा वापर करणे व त्याच्याशी संबंधित असणा-या कौशल्ये व पारंपारिक ज्ञानाचा समुदायाचा सामुदायिक अधिकार.

१३. असे कोणतेही अधिकार जे शासकिय किंवा स्वतंत्र आदिवासी समुहाने घोषित केलेले असेल, अशाप्रकारचे कोणतेही अधिकार ज्यात इमारती लाकुड व वन्यजीव याचा उल्लेख नसेल अशा सर्व नोंदी कायम करण्याचा अधिकार.

१४. निसर्गातील जैविक (वनस्पती) विविधतेचा वापर करणे व त्याच्याशी संबंधित असलेल्या पारंपारिक कौशल्य व ज्ञानाचा एवं सांस्कृतिक विविधतेशी संबंधित असलेल्या बौधिक मालमत्तेचा,पारंपारिक ज्ञान मिळविण्याचा सामुहीक हक्क.

१५. आदिवासी जमाती (पाचव्या अनुसुचितल्या जमाती) व १३ डिसेंबर २००५ पुर्वी ७५ वर्षापासून असलेले इतर वन निवासी यांचे घरठान, शेतजमिन, पारंपारिक ज्ञान व्यतिरिक्त असलेले इतर अधिकारांना कायम करणे. परंतू अशा अधिकारांमध्ये शिकार, सापळा घालुन प्राण्यांना पकडणे किंवा जनावरांच्या अंगाचा कोणताही भाग काढून घेणे याचा सामावेश नाही.

१६. जर आदिवासी व जंगलात राहणा-या इतर समुदायास १३ डिसेंबर २००५ पुर्वी बेकायदेशीररित्या विस्थापित केले असेल किंवा त्यांच्या जमिनी हिसकावून लावल्या असेल तर अशांना त्यांच्या होत्या त्या जमिनी किंवा पर्यायी जमिनीवर कायदेशीर मालकीचा अधिकार.

आम्हाला जंगलावरील हक्क इतर कोणालाही देता येतील का ?
नाही, या कायद्याने दिलेले हक्क हे कोणालाही देता येणार नाहीत किंवा कोणालाही विकता येणार नाहीत. परंतु हे हक्क पिढयानपिढया वारसारूपाने चालू राहतील.

- या कायद्यामध्ये नमुद केलेल्या अधिकारांसमोर काही कर्तव्य आहेत का ? त्यांचे पालन केले नाही तर काय होईल ?

या कायद्यात मांडलेल्या अधिकारांसमोर काही जवाबदा-या देखिल मांडल्या आहेत. जर या जवाबदा-यांचे पालन झाले नाही किंवा अधिकार मिळाल्यापासून पुढील पाच वर्षात जंगलांचा -हास नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात जाणवला तर या पाच वर्षानंतर आपले अधिकार रद्द करण्यात येवू शकतात.

तर या जवाबदा-या काय आहेत हे आपण समजून घेवू...........

१. जंगलातील प्राणी, जंगल व त्यातील जैविक विविधतेचे संरक्षण करणे.

२. वस्तीच्या जवळची पाण्याची ठिकाणे व पर्यावरनदृष्टया संवेदनशील असणा-या ठिकाणांचे गरजेनुसार संरक्षण करणे.

३. आदिवासी व इतर वननिवासींच्या वंशागत पध्दती राहनीमान व त्यांची नैसर्गिक संपत्ती अशा क्षेत्रांचे संरक्षण.

४. वनसंपत्ती, जंगलातील प्राणी, जैविक विविधता व त्यांना हानिकारक असलेल्या पध्दती थांबविण्यासाठी ग्रामसभेने ठराव केलेत याची खात्री करणे.



**या कायद्यात गावासाठी असणा-या काही सुविधांसाठी जंगल जमिनीचे हस्तांतरन करण्याची तरतुद केली आहे का ?**

वनसंवर्धन कायदा १९८० मध्ये ज्या मुलभूत सोयींचा विचार झाला नाही अशा सोयींसाठी या कायद्यात तरतूद केली आहे. खालील मांडलेल्या सोयी सुविधा जर शासन प्रशासित असेल व त्यांच्या मांडणीसाठी प्रती हेक्टर ७५ पेक्षा जास्त झाडे तोडावी लागणार नसेल अशा जंगल जमिनींचे हस्तांतरन केंद्र सरकार करू शकते. यात मोडत असलेल्या सोयीसुविधा पुढील प्रमाणे,

- शाळा
- अंगणवाड्या
- विद्युत व टेलिफोन लाईन
- तलाव व अन्य छोटे जलाशय
- पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व नळयोजना
- पिण्याच्या व पावसाच्या पाण्यासाठीचे छोटे कालवे
- लघु पाटबंधारे
- कौशल्ये विकास व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र
- रस्ते व समाज मंदिरे
- दवाखाना किंवा हॉस्पिटल
- स्वस्त धान्य दुकाने
- अपारंपारिक उर्जा स्त्रोत/पर्याय

अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांसारख्या संरक्षित क्षेत्रामध्ये हक्कांवर काही बंधने असतील का ?

या कायद्यानुसार वननिवासी व आदिवासी यांचे अधिकार अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांमध्येही कायम राहतील. तर अशा क्षेत्रातील वन्य प्राण्यांना किंवा त्यांच्या वसतिस्थानाला लोकांच्या वावरामुळे किंवा त्यांच्या अधिकारामुळे धोका पोहोचत असेल, असे जर शास्त्रीय अभ्यासातून सिध्द झाले, तर क्रिटिकल वाईल्ड लाईफ हॅबीटाट म्हणजेच सुरक्षितता व संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले वन्य-प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण तयार केले जावू शकते. त्यामुळे अशा क्षेत्रातील लोकांच्या वावरावर व जंगल हक्कांवर निर्बंध येतील किंवा अशा क्षेत्रातील लोकांचे इतर ठिकाणी पुनर्वसनही केले जावू शकते व त्या क्षेत्रात माणसाच्या वावरास मनाई करण्यात येवू शकते.



- परंतु असे क्षेत्र बनविण्यासाठी कोणत्या बाबींची पूर्तता करावी लागेल ?

  वरील क्षेत्र निश्चित करण्याअगोदर खालील बाबींची पूर्तता करावी लागेल तसेच या सर्व गोष्टींची पूर्तता केल्या खेरीज कोणत्याही व्यक्तीचे पुनर्वसन केले जावू शकत नाही किंवा त्याच्या अधिकारांवर निर्बंध लादता येणार नाही.

  - असे क्षेत्र घोषित करण्याअगोदर या ठिकाणातील सर्व लोकांचे याकायद्याअंतर्गत (वन अधिकार) जंगलावरील हक्क मान्य करणे व ते हक्क लोकांना सुपूर्द करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

- जंगलातील प्राण्यांच्या जिवाला व त्यांच्या वसतिस्थानाला जंगलात राहणा-या लोकांच्या कृतीमुळे व त्यांच्या जंगलावरील अधिकारांमुळे धोका पोहोचत आहे असे सरकारला शास्त्रीय व पध्दतशीर अभ्यासाने सिध्द् करावे लागेल.
- अशा ठिकाणात जंगली प्राणी व माणूस एकत्र राहू शकत नाही असा जर निष्कर्ष राज्य शासनाने काढलेला असल्यास.
- पुनर्वसन करण्यासाठी पर्यायी जागा व पुर्नवसनाचा आराखडा तयार करणे व त्याची माहिती लोकांना देणे.
- ग्रामसभेची पुनर्वसन आराखडयावर लेखी संमती घेणे बंधनकारक आहे.
- पुनर्वसनाच्या आराखडयाप्रमाणे जमिनी व इतर सोयी-सुविधा दिल्याशिवाय कोणालाही विस्थापित केले जाणार नाही.

**अधिकार मान्यतेसाठीची यंत्रणा**

या कायद्यातील मांडलेल्या जंगलावरील अधिकार मान्य करण्याच्या प्रक्रियेसाठी कोणकोणत्या संस्था/समित्या आहेत ?

या कायद्यात जंगलावरील जे हक्क सांगितले आहेत ते मान्य करण्यासाठी काही समित्यांची रचना करण्यात आली आहे. त्या समित्या खालीलप्रमाणे आहेत,



➢ या कायद्याअंतर्गत कशाला गाव म्हटले आहे

१. या कायद्याअंतर्गत गाव म्हणजे तेच गाव ज्याची व्याख्या अनुसूचित क्षेत्रात लागू होणा-या १९९६ च्या पंचायत कायद्यात मांडली आहे.

२. असे गाव ज्याच गाव म्हणून सर्वेक्षण झाले नाही परंतू पारंपारिकरीत्या तेथिल समाज सर्व निर्णयांसाठी एकत्र बैठक करतो. ब-याच वेळेस अशा बैठकीचे नाव गाव बैठक, चावडी बैठक, वनराई बैठक इत्यादी म्हणून माहितीत असते.

३. ज्याठिकाणी ग्रुप ग्रामपंचायत आहेत त्याठिकाणी त्याच्या अंतर्गत असलेल्या प्रत्येक गावाला वेगळे गाव म्हणून या कायद्याखाली पाहिले जावे.

१. **ग्रामसभा ः**

आदिवासींचे व जंगलावर आधारित इतर समुदायांच्या जंगलावरील व्यक्तिगत व सामुदायिक हक्कांच्या मान्यतेसाठी गावपातळीवर ग्रामसभा ही सर्वोच्च संस्था म्हणून काम पाहील. हक्क मान्यतेची व नोंदणीची प्रक्रिया करण्यासाठी ग्रामसभा आपल्या उपस्थित सदस्यांमधून 'वन अधिकार समिती' ची निवड करेल. ग्रामसेवक हा ग्रामसभेचा सचिव म्हणून काम पाहील.

- **ग्रामसभेसाठी गणपूर्ती / कोरमची गरज आहे का?**

ग्रामसभा बैठकीसाठी एकूण सदस्यांच्या २/३ पेक्षा जास्त उपस्थिती असावी. ज्या गावात आदिवासी व बिगर आदिवासी लोक राहतात. अशा ठिकाणी आदिवासी व आदिम जमाती यांच्या सदस्यांचे प्रमाण पुरेसे असावे.



या ग्रामसभेमध्ये जास्तीत जास्त लोकांचा सहभाग असावा की, ज्यामुळे हक्क मान्यतेची प्रक्रिया चांगल्या प्रकारे व सर्वांचे मत विचारात घेऊन होऊ शकेल.

- **या वन अधिकार समितीची निवड कोण करेल?**

ग्रामसभा बोलावली जाईल व तिच्या पहिल्या बैठकीत तेथील उपस्थित असणाऱ्या लोकांमधून वन अधिकार समितीची निवड केली जाईल.

- **या वन अधिकार समितीची रचना कशी असली पाहिजे?**

हा कायदा राबविण्यासाठी मांडलेल्या नियमानुसार कमीतकमी १० व जास्तीत जास्त १५ सदस्य असले पाहिजे. त्यातील कमीत कमी २/३ सदस्य अनुसूचित जमातीचे असतील आणि त्यामध्ये १/३ सदस्य महिला असतील. जेथे आदिवासी समाज नसल्यास तेथे किमान १/३ महिला सदस्य असतील. जेथे आदिवासी समाज असेल तेथे जर १० लोकांची समिती असेल, तर त्यात किमान ३ लोक आदिवासी जमातीतील असावेत व या ३ अधून १ सदस्य महिला असावी. इतर सदस्यांपैकी १/३ सदस्य महिला असाव्यात म्हणजेच १० सदस्यांपैकी ३ महिला सदस्य असाव्यात.

- **वनाधिकार समितीचे सदस्य निवडताना कोणकोणत्या गोष्टी पाहाणे गरजेचे आहे?**

वनधिकार समिती ही गाव पातळीवरील हक्क मिळवण्याच्या प्रक्रियेतील अतिमहत्त्वाची समिती आहे. त्यामुळे या समितीतील निवडले जाणारे सदस्य हे आपल्या समुदायाबद्दल आस्था असणारे, निर्भिडपणे बोलणारे, जंगल व संस्कृतीबद्दल आपुलकी असणारे, सर्वांचे म्हणणे ऐकून घेणारे व जंगल संवर्धनात चांगला सहभाग घेणारे असावेत.

- **ग्रामसभा व वनाधिकार समिती कोणत्या प्रकारची कामे करेल ?**

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तयार केलेल्या नियमांमध्ये ग्रामसभा व वनाधिकार समितीची कामे दिलेली आहेत ती पुढीलप्रमाणे ः

**वनअधिकार स्थापित करण्यासाठीची कामे,**

१. जंगलावर असणा-या अधिकारांचे दावे किंवा अर्ज स्वीकारून त्यांची सुनावणी करणे.

२. वन अधिकारांच्या अर्जदारांची यादी तयार करून अर्जदाराबाबतचे व त्यांच्या दाव्याबाबतचे§ तपशील असलेली नोंदवही ठेवणे.

३. गाव पातळीवरील ग्रामसभेमध्ये ठराव करून सर्व वैयक्तिक व सामुहीक अधिकारांना मान्य करून घेणे व मान्य केलेले हे ठराव त्यांच्या पुराव्यासोबत उपविभागीय समितीकडे दाखल करणे.

**वन अधिकार समितीच्या इतर जबाबदा-या**

१. दावे दाखल झाल्यानंतर वनसंरक्षण/ संवर्धन, वन्य प्राणी व जैविक विविधता संरक्षणे यासर्वांकरीता वेळोवेळी ठरवून त्याप्रमाणे ग्रामसभेत ठराव घेणे व त्याच्या पालनाची नोंद ठेवणे. गरजेप्रमाणे त्यासाठीच्या समित्या निर्माण करणे.

२. संकटग्रस्त वन्यजीवांचे वसतिस्थान/क्रिटिकल वाईल्ड लाईफ हॅबीटाट म्हणजेच सुरक्षितता व संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले वन्य प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण तयार करण्यासाठी लोकांचे जर विस्थापन होत असेल, तर त्यांच्या पुर्नवसन आराखडयाचा योग्य विचार करून त्यासंबंधीचा ठराव करणे.

## २. उपविभागीय समिती (तालुका स्तरीय)ः

ग्रामसभेने पाठविलेले ठराव तपासण्यासाठी राज्य सरकार उपविभागीय समिती नियुक्त केली आहे. ही समिती वन अधिकारांच्या नोंदी तयार करून त्या तपासून उपविभागीय अधिका-यांमार्फत जिल्हा स्तरीय समितीकडे अंतिम निर्णय करण्यासाठी सादर करेल.

### ❖ या समितीचे सदस्य कोण आहेत ?

- उपविभागीय अधिकारी किंवा त्या पातळीचा अधिकारी - अध्यक्ष
- उपविभागीय वन अधिकारी किंवा त्या पातळीचा इतर अधिकारी – सदस्य
- जिल्हा परिषदेने नेमणूक केलेले तालुका पंचायत समितीचे ३ सदस्य ज्यांपैकी किमान २ अनुसूचित जमातींपैकी असतील. यात वनवासी व आदिम जमातीतील सदस्यांना प्राधान्य दिले जाईल. जेथे अनुसूचित जमाती नसतील तेथे २ सदस्य परंपरागत वनवासी असतील की, ज्यांपैकी एक महिला सदस्य असेल.
- उपविभागाची जबाबदारी असलेला आदिवासी कल्याण खात्याचा अधिकारी नसेल तेथे आदिवासी व्यवहाराची जबाबदारी असणारा अधिकारी.

### ❖ ही उपविभागीय समिती काय करेल?

- नष्ट होत असलेल्या वनस्पती व प्राणी तसेच जंगल व जैवविविधता संरक्षण व संवर्धनासंबंधात लोकांच्या जबाबदा-यासंबंधी ग्रामसभेला माहिती पुरवणे.
- ग्रामसभा व वन अधिकार समित्यांना जंगल व महसुली नकाशे आणि मतदार याद्या पुरविणे.
- ग्रामसभेने पास केलेले ठराव, दिलेले नकाशे व एकत्रित करून तपासने.
- वन अधिकारांच्या व्याप्ती व स्वरूपासंदर्भातील ग्रामसभांमधील विवादांची सुनावणी व निर्णय देणे.
- ग्रामसभेच्या ठरावामुळे असमाधानी असलेल्या व्यक्तीच्या अर्जाची सुनावणी करणे.
- इतर उपविभागातील दाव्यासाठी त्या त्या उपविभागांशी संपर्क साधणे.
- शासनाच्या नोंदींशी मेळ घातल्यानंतर वनाधिकारांच्या तालुक्यानुसार नोंदी करून अंतिम निर्णयासाठी जिल्हा पातळीवरील समितीकडे पाठविणे.
- कायदा व नियमांमध्ये दिलेल्या उद्दिष्टांविषयी व पध्दतीविषयी जंगलात राहणा-या लोकांमध्ये जाणीव- जागृती निर्माण करणे.
- दाव्यांसाठीचे अर्ज लोकांना पुरेसे व मोफत उपलब्ध आहेत याची खात्री करणे.
- आवश्यक गणपूर्तीनुसार (२/३ हजेरी) ग्रामसभेच्या बैठकी मुक्त वातावरणात व प्रामाणिकपणे चालवल्या जात आहेत याची खात्री करणे.

**3. जिल्हा स्तरीय समिती** :

उपविभागीय समितीने तयार केलेल्या वनाधिकाराच्या नोंदी तपासून त्यांना अंतिम मान्यता देण्यासाठी राज्य शासन जिल्हा स्तरीय समिती निवडेल. वन अधिकारांबाबत या समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

- या समितीचे सदस्य :
  - जिल्हाधिकारी किंवा उपायुक्त - अध्यक्ष
  - संबंधित विभागीय वनअधिकारी किंवा उपवनसंरक्षक -सदस्य
  - जिल्हा परिषदेने नेमलेले ३. जि.प. सदस्य ज्यांपैकी किमान २ अनुसूचित जमातींपैकी असतील. यात वनवासी व आदिम जमातीतील सदस्यांना प्राधान्य दिले जाईल. जेथे अनुसूचित जमाती नसतील तेथे २ सदस्य परंपरागत वनवासी असतील व त्यांपैकी एक महिला सदस्य असेल.
  - जिल्हयाची जबाबदारी असलेला आदिवासी कल्याण खात्याचा अधिकारी किंवा असा अधिकारी उपलब्ध नसेल तेथे अदिवासी व्यवहाराची जबाबदारी असणारा अधिकारी.
- **यासमितीची काय कार्ये असतील** ?
  - उपविभागीय समितीने ग्रामसभा व वनअधिकार समित्यांना आवश्यकता माहिती पुरविली आहे की नाही याची खात्री करणे.

- कायद्याचे उद्दिष्ट डोळयांसमोर ठेवून सर्व विशेषत: आदिम जमाती गुराखी समाज व भटक्या जमातींच्या दाव्याचा समावेश झाला आहे किंवा नाही हे तपासणे.
- उपविभागीय समितीने तयार केलेले दावे व वनाधिकारांच्या नोंदींवर विचार करून त्याला अंतिम मान्यता देणे.
- उपविभागीय समितीच्या हुकमाने असमाधानी असलेल्या व्यक्तीच्या अर्जाची सुनावणी करणे.
- आंतर जिल्हयातील दाव्यांसदर्भात त्या त्या जिल्हयांशी समन्वय करणे.
- वनधिकारांशी संबंधित शासकीय नोंदींमध्ये वनाधिकारांचा समावेश करण्यासाठी सूचना देणे.

- अंतिम स्वरूप दिलेल्या वनाधिकारांच्या नोंदी प्रसिद्ध केल्याची खात्री करणे.
- वनाधिकारांच्या नोंदी व या कायद्याखालील हक्कपत्र यांच्या प्रमाणित नकलासंबंधित दावेदार व ग्रामसभा यांना पुरवल्या आहेत याची खात्री करणे.

४. **राज्यस्तरीय देखरेख समिती** :

वनाधिकार मान्य करणे व ते सुपूर्द करण्याच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी राज्य शासन एका राज्यस्तरीय देखरेख समितीची निवड करेल.

**समितीचे सदस्य** :

१. मुख्य सचिव अध्यक्ष.

२. सचिव,महसूल विभाग सदस्य.

३. सचिव, आदिवासी समाजकल्याण विभाग सदस्य

४. सचिव, वनविभाग सदस्य.

५. सचिव, पंचायत राज विभाग सदस्य.

६. प्रधान मुख्य वनसंरक्षक सदस्य.

७. आदिवासी सल्लागार मंडळाने नेमणूक केलेले मंडळाचे तीन आदिवासी सदस्य आणि जेथे आदिवासी सल्लागार मंडळ नसेल तेथे राज्य शासनाने नेमणूक केलेले अनुसूचित जमातीचे 3 सदस्य.

८. आयुक्त आदिवासी कल्याण किंवा समकक्ष अधिकारी की जो सदस्य सचिवाचे काम बघेल.

**समितीचे कार्ये** :

- वनाधिकारांना मान्यता देणे व सुपूर्द करण्याच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी नियम व मार्गदर्शक तत्वे तयार करणे.
- राज्यातील वनाधिकारांना मान्यता देणे व ते सुपूर्द करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवणे.

- वनाधिकारांना मान्यता देण्याच्या प्रक्रियेचा सहा महिन्यांचा अहवाल तसेच इतर मागवलेले अहवाल नोडल एजन्सीला सादर करणे.
- गुन्हा घडलेल्या आधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करणे.
- या कायद्यांतर्गत तयार झालेल्या आदिवासीच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवणे.

➢ **अर्जप्रक्रिया** ः

ही जंगलावरील अधिकार मान्य करण्याची प्रक्रिया कशा प्रकारे चालेल ?

आदिवासी व जंगलावर आधारित परंपरागत इतर समाजाच्या जंगलावरील हक्क मान्य करण्यासाठीची प्रक्रिया या कायद्यामध्ये सविस्तर दिलेली आहे. ती खालीलप्रमाणे ः

**ग्रामसभेने दावे मागवण्याची प्रक्रिया ः**

१. ग्रामसभा वनाधिकार समितीची निवड करेल.

२. ग्रामसभा वनाधिकारासंबंधी अर्ज मागविण्याचा अधिकार वनाधिकार समितीस देईल. असे अर्ज मागविल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत हे अर्ज दाखल केले जातील. आवश्यकता वाटल्यास ग्रामसभा तशी लेखी कारणे देऊन हा तीन महिन्यांचा कालावधी वाढवू शकते.

३. ग्रामसभा आपली सामुदायिक वन संसाधने ठरविण्यासाठी तारीख निश्चित करून शेजारील ग्रामसभा (जर त्यांच्या हद्दीतील जंगलाचा वापर करत असल्यास) व उपविभागीय समितीला तो तारीख कळवेल.

४. सामुदायिक वनाधिकारांचा दावा वनाधिकार समिती ग्रामसभेच्यावतीने करेल.

५. वनाधिकार समितीने दिलेल्या निष्कर्षावर विचार करण्यासाठी पूर्वसूचना देऊन ग्रामसभा बैठक बोलावली जाईल व त्यामध्ये ठराव पास करून तो उपविभागीय समितीकडे पाठवला जाईल.

६. ग्रामसभेची कार्ये पार पाडण्यासाठी ग्रामपंचायत सचिव हा ग्रामसभेचा सचिव म्हणून काम पाहील.

**वनधिकार समितीने दावे पडताळण्याची प्रक्रिया ः**

१. लोकांकडून वनधिकारांचे दावे मागविणे

1. नियमांमध्ये दिलेल्या अर्जाप्रमाणे दावेदारांकडून दावे व त्यासाठीचे पुरावे स्विकारून त्याची पोहोच देणे.
2. दावे व नकाशांसह पुराव्याची नोंद करणे (स्थानिक लोकांनी बनविलेले नकाशे पण पुरावे म्हणुन स्विकारले जातील).



४. प्रत्यक्ष जागेवर जाऊन दाव्याचे स्वरूप, व्याप्ती व क्षेत्र, पुरावे यांची तपासणी करणे.

५. दाव्यासंबंधातील निष्कर्ष ग्रामसभेसमोर विचार करण्यासाठी मांडणे.

६. एकच वनक्षेत्र एकापेक्षा अनेक गावांच्या वापरात असेल किंवा त्यांच्यात पारंपारिक हक्क व सीमांबद्दल वाद निर्माण झाला असेल, तर संबधित ग्रामसभांच्या वनाधिकार समित्या विचार करण्यासाठी एकत्र बसतील. जर अशा ग्रामसभा दाव्यासंबंधीचा वाद मिटवू शकल्या नाहीत, तर ती बाब ग्रामसभा उपविभागीय समितीकडे पाठवावी लागेल.

**हक्क मान्यतेसाठी नियमांमध्ये दिलेले अर्ज वापरणे बंधनकारक आहे का?**

होय, परंतु हा अर्ज अपुरा वाटल्यास आपण या अर्जाला आपल्या हक्कांच्या नोंदींच्या सविस्तर माहितीची इतर जास्त पाने जोडू शकता.

**ग्रामसभेने किंवा वनाधिकार समितीने कोणत्याही शासकीय कार्यालयात मागवलेली माहिती देणे त्या अधिकार्यांवर बंधनकारक आहे का?**

होय, ग्रामसभेने किंवा वनाधिकार समितीने लेखी मागवलेली माहिती, नोंदी, नकाशे किंवा इतर कागदपत्रे देणे त्या अधिका□यांवर बंधनकारक आहे.

**१वनाधिकार ठरविण्यासाठी काही पुरावे लागतील का ?**

होय, वनाधिकार ठरवताना काही पुराव्यांची गरज लागणार आहे. ग्रामसभा, उपविभागीय समिती व जिल्हास्तरीय समिती खाली नमूद केलेल्या पुराव्यांपैकी एकापेक्षा जास्त पुराव्यांचा विचार करतील.

- **वैयक्तिक पुराव्यासाठी खालील गोष्टींचा समावेश ः**
  - सार्वजनिक कागदपत्रे, शासनाचे राजपत्र, जनगणना, सर्वेक्षण, अहवाल, नकाशे, उपग्रहाने काढलेले फोटो, सूक्ष्म आराखडे, वनचौकशी अहवाल, इतर वनविषयक नोंदी पट्टे किंवा जंगलावरील हक्कांच्या बाबीतील नोंदी, आयोगांचे अहवाल, शासन निर्णय, जाहीरनामे, ठराव व परिपत्रक.
  - मतदान ओळखपत्र , रेशनकार्ड , घरपट्टी, रहिवाशी दाखले.
  - भौतिक पुरावे जसे घर, झोपडी व कायमच्या जमीन सुधारणा की ज्यात सपाटीकरण, बांध, बांधारे इ.
  - न्यायालयाच्या आदेशासारख्या न्यायालयीन नोंदी .
  - वनाधिकारासंदर्भात एखाद्या संस्थेने केलेला अभ्यास अहवाल, संशोधन इ.
  - राजे, सरदार, संस्थाने किंवा त्यासारख्या इतर संस्थांचे नकाशे, हक्क नोंदी, अधिकार, सवलती यांच्या नोंदी
  - विहिरी, मसणवट,पवित्र ठिकाणे यांसारख्या पुराणकालीन रचना
  - वंशावळ नोंदी
  - दावेदाराव्यतिरिक्त अन्य ज्येष्ठ व्यक्तींचा लिखित जबाब.
- सामुदायिक वनाधिकारांसाठी खालील पुराव्यांचा समावेश राहील ः
  - निस्तार सारखे कोणत्याही नावाने ओळखले जाणारे सामुदायिक अधिकार
  - जनावरे चरण्यासाठीचे पारंपरिक मैदाने,कंदमुळे, चारा, रानफळे व अन्य वनोपज गोळा करण्याच्या जागा, मासे पकडण्याच्या जागा, सिंचनव्यवस्था, मानवांच्या किंवा जनावरांच्या वापराची ठिकाणे, वैदूंचे वनौषधी गोळा करण्याची ठिकाणे.

- समाजाने केलेल्या बांधकामाचे शिल्लक भाग, पवित्र वृक्ष, बागा व तळी किंवा दफनभूमी.
- वरिल सर्व प्रकारचे ठिकाण दाखवणारे व ग्रामसभेने मंजूर केलेला नकाशा.

**वरील सर्वच पुरावे असणे गरजेचे आहे का ?**
नाही, अर्जासोबत वरीलपैकी कमीतकमी दोन पुराव्यांची गरज आहे व हे पुरावे तयार करण्यासाठी वनाधिकार समितीने तुम्हांला मदत केली पाहिजे.

१. जर एखादा निर्णय आम्हाला मान्य नसेल, तर आम्ही काय करू शकतो ?

उपविभागीय समितीकडे करावयाचे अपील किंवा तक्रार अर्ज :□

- ग्रामसभेचे ठराव मान्य नसणारी कोणतीही व्यक्ती ठराव केलेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपविभागीय समितीकडे अर्ज करेल. नोटीस लावून सुनावणीची तारीख व वेळ ठरवेल.
- ही समिती १५ दिवस आधी लेखी नोटीस देऊन व गावातील सार्वजनिक ठिकाणी
- ही समिती आलेला अर्ज दाखल करून घेईल किंवा नाकारील किंवा पुनर्विचारासाठी ग्रामसभेकडे पाठवू शकते. अर्जावर ग्रामसभेने ३० दिवसांत बैठक घेऊन अर्जदाराचे म्हणणे ऐकून ठराव संमत करून तो उपविभागीय समितीस पाठवेल.
- दोन किंवा अधिक ग्रामसभांच्या विवादाबाबत ३० दिवसांच्या आत परस्पर संमतीने तोडगा निघाला नाही तर समिती संबंधित ग्रामसभांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य तो आदेश देईल.

२. **जिल्हा समितीकडे करावयाचे अपील :**□

उपविभागीय समितीचा निर्णय मान्य नसलेली कोणतीही व्यक्ती निर्णयाच्या ६० दिवसांच्या आत जिल्हा समितीकडे अर्ज सादर करेल.

- जिल्हा समिती १५ दिवस आधी लेखी नोटीस देऊन व गावातील

सार्वजनिक ठिकानी नोटीस लावून सुनावनीची तारीख व वेळ निश्चित करेल.

ही समिती आलेला अर्ज दाखल करून घेईल किंवा नाकारील किंवा पुनर्विचारासाठी संबंधित उपविभागीय समितीकडे पाठवू शकते अर्ज मिळाल्यानंतर उपविभागीय समिती अर्जदार व ग्रामसभेचे म्हणणे ऐकून निर्णय घेऊन तो जिल्हा समितीस पाठवेल. यानंतर जिल्हा समिती विचार करून अर्ज मान्य किंवा अमान्य करून योग्य तो आदेश देईल.

दोन किंवा अधिक उपविभागीय समितीच्या आदेशातील विसंगतीबाबत जिल्हा समिती संबंधित उपविभागीय समितीची बैठक बोलावेल. परस्पर संमतीने तोडगा निघाला नाही, तर त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन जिल्हा समिती योग्य तो आदेश देईल.

**एखाद्या अधिका-याने किंवा समितीने या कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन केले तर त्याला शिक्षा होऊ शकते का ?**

होय, जर एखाद्या समितीने किंवा अधिका-याने या कायद्यातील किंवा नियमातील तरतुदींच्या विरोधात वर्तन केले किंवा या कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केले तर ग्रामसभेने ठराव करून त्या अधिका-याला ६० दिवसांची नोटीस दयावी लागेल व त्या कालावधीत उत्तर न मिळाल्यास १००० रू पर्यंत दंड करण्यात येईल.



या कायद्याअंतर्गत ठरविलेल्या प्रत्येक समितीच्या अधिका-याला शासकिय कार्मचारी म्हणून समजले जाईल.

**टीप** : स्थानिक पातळीवर सोप्या भाषेत या कायद्याचे ज्ञान पोहचून गावात कायद्याच्या वापरास व अंमलबजावणीस चालना मिळण्याच्या हेतुने इकोनेट, पुणे या संस्थेने या संदर्भपुस्तिकेची निर्मिती केली आहे. शासकीय व कायदेविषयक कामासाठी कृपया शासनाने प्रकाशित केलेली कायद्याची प्रत वापरावी